क्र.कक्ष-4/मंडप, बॅरि.साहित्य भाडे/एएमसी/2023- 310 सोलापूर शहर. दि.~~21~~ 25-04-2023

विषय :- **विविध बंदोबस्त व कार्यक्रम- 2023 करीता.**
मंडप, स्टेज, फर्निचर, बॅरिकेटींग, कापडी पार्टीशन
व इतर आवश्यकते प्रमाणे साहित्य भाडे तत्वावर घेणे.
संकेतस्थळावरुन सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

---**---

आदेश :-

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर की, सोलापूर शहरामध्ये विविध सण, उत्सव, मिरवणूक, निवडणूका, शासकीय दौरे निमित्त पोलीस बंदोबस्त प्रसंगी कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणून कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता, तसेच विविध कार्यक्रम व पोलीस भरती प्रक्रिया याकरीता मंडप, स्टेज, फर्निचर, बॅरिकेटींग, कापडी पार्टीशन व इतर आवश्यकते प्रमाणे साहित्य भाडे तत्वावर घेणे करीता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालयाचे संकेतस्थळावरुन सिलबंद दरपत्रके मागविण्याकरीता सोबतची जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

मा.पोलीस आयुक्त
यांचे मान्यतेने.

( अजित बोऱ्हाडे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्तसोलापूर शहर
यांचेकरीता.

प्रति,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे, सोलापूर शहर.

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

## जाहिरात

सोलापूर शहरामध्ये विविध सण, उत्सव, मिरवणूक, निवडणूका, शासकीय दौरे निमित्त पोलीस बंदोबस्त प्रसंगी कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणून कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता, तसेच विविध कार्यक्रम व पोलीस भरती प्रक्रिया याकरीता मंडप, स्टेज, फर्निचर, बॅरिकेटींग, कापडी पार्टीशन व इतर आवश्यकते प्रमाणे साहित्य भाडे तत्वावर घेणे करीता प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने खालील अटी व शर्तीचे अधीन राहुन सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक व्यावसायिक यांनी खालील अटी व शर्तीचे अधीन राहुन सिलबंद दरपत्रके सादर करावीत.

वरील नमुद कामकाजा संदर्भात खालील नमुद अटी व शर्ती राहतील.

1. सदरचा वार्षिक दर करार पुरवठा आदेश दिलेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरीता असणार आहे.
2. नमुद भाडे तत्वावरील साहित्य लावण्याचे ठिकाणी जाण्याचा, येण्याचा व इतर कुठल्याही प्रकारचा खर्चाची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
3. या कार्यालयास न्युनतम दराची निविदा मान्य करण्याचे बंधन असणार नाही. कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित निविदा मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.
4. निविदेमधील सर्व काम हे कामाचे तुकडे करुन काम वेगवेगळया निविदाकारांना देण्यात येणार नाही. एकाच पात्र निविदाधारकास दरपत्रकातील दराच्या वाटाघाटीस अनुसरुन एकवट पध्दतीने देण्यात येईल.
5. पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर अंतर्गत सोलापूर शहरातील विविध सण, उत्सव, मिरवणूक, शासकीय दौरे तसेच इतर कार्यक्रम साजरे केले जातात. त्या अनुषंगाने सोलापूर शहरामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये आणि पोलीस बंदोबस्ताचे वेळी कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता तत्पर अत्यावश्यक साहित्य लावण्याकरीता हजर रहावे लागते. त्यामुळे कोणतीही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही.
6. तसेच अत्यंत महत्वाचे कामाकरीता अचानकपणे ब-याच मंडप, स्टेज, बॅरिकेट व इतर आवश्यक साहित्य याची आवश्यकता भासते. याबाबतची सेवा तातडीने मिळणे आवश्यक असते.
7. या निविदेतील कोणती ही अट रद्द करण्याचा/शिथील करण्याचा किंवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा संपूर्ण अधिकार पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांनी राखून ठेवला आहे.
8. सदर कामाचे बिल हे पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापुर शहर यांना अनुदान उपलब्ध झाल्यास अदा केले जाईल.
9. सदरचे बिल अदा करताना नियमाप्रमाणे टी.डी.एस. / जी.एस.टी. कपात केला जाईल.
10. परंतु एखादया महिन्यात अनुदान उपलब्ध न झाल्यास सदर बिलावरती कोणतेही व्याज मागता येणार नाही.
11. परस्पर पूर्व परवानगीशिवाय साहित्य लावण्यात आल्यास त्याबाबतच्या देयकास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
12. वार्षिक देखभाल करार चे देयक कामाची पुर्तता होताच तात्काळ संबंधीत पोलीस ठाणे / शाखा / विभाग / पथक / कक्ष या कार्यालयाचे प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने तीन प्रतीत या कार्यालयास सादर करतील.
13. विहित मुदतीत/वेळेत काम न केल्यास व तक्रार प्राप्त झाल्यास अथवा असमाधानकार काम केल्यास आवश्यक ती कारवाई करण्याचे हक्क पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांचेकडे राहतील.
14. स्विकृत पुरवठादाराने दराबाबत व कामकाजाबाबत पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापुर शहर यांचे बरोबर रु.100/- स्टॅम्पपेपरवर नोटरीद्वारे कंत्राटदार यांनी स्वखर्चाने करार करणे बंधनकारक आहे.
15. सिलबंद दरपत्रकावर मा.पोलीस आयुक्त सोलापूर शहर असे नांव व संबंधीत फर्मचे नांव एका कोपऱ्यात असावे.
16. नमुद कामाची सिलबंद दरपत्रके 05 दिवसात या कार्यालयात बारनिशी विभाग येथे सादर करावीत.

**मा.पोलीस आयुक्त**
**यांचे मान्यतेने.**

( अजित बोऱ्हाडे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्तसोलापूर शहर
यांचेकरीता.

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

विषय :- विविध बंदोबस्त व कार्यक्रम- 2023
मंडप, स्टेज, बॅरिकेट, फर्निचर, कापडी पार्टीशन
व इतर साहित्य भाडे तत्वावर घेणे.
- वार्षिक दर करार करणे बाबत.

---**---

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | प्रति नग / स्क्वेअर फुट / रनिंग फुट | प्रति दिन प्रति दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | मंडप साधा | प्रति स्क्वेअर फुट | |
| 2 | मंडप पत्रासह | प्रति स्क्वेअर फुट | |
| 3 | रेड / ग्रीन कारपेट | प्रति स्क्वेअर फुट | |
| 4 | स्टेज | प्रति स्क्वेअर फुट | |
| 5 | वॉच टॉवर 6x6x12 | प्रति स्क्वेअर फुट | |
| 6 | कापड पार्टीशन (फ्रेमवर्कसह) | प्रति रनिंग फुट | |
| 7 | लाकडी बॅरिकेटींग (3 Layer) | प्रति रनिंग फुट | |
| 8 | जाळी बॅरिकेट | प्रति रनिंग फुट | |
| 9 | प्रेक्षक गॅलरी | प्रति रनिंग फुट | |
| 10 | सर्व्हिस वायर | प्रति रनिंग फुट | |
| 11 | प्लास्टीक खुर्च्या कव्हरसह | प्रति नग | |
| 12 | प्लास्टीक खुर्च्या कव्हर शिवाय | प्रति नग | |
| 13 | व्हिआयपी खुर्च्या कव्हरसह | प्रति नग | |
| 14 | सोफा 3सीटर कव्हरसह | प्रति नग | |
| 15 | लेदर व्हिआयपी सोफा | प्रति नग | |
| 16 | टी पॉय | प्रति नग | |
| 17 | टेबल 4x2 कव्हरसह /फ्रिलसह | प्रति नग | |
| 18 | टेबल 6x2 कव्हरसह /फ्रिलसह | प्रति नग | |
| 19 | राऊंड टेबल | प्रति नग | |
| 20 | राऊंड टेबल कव्हर / फ्रिल सह | प्रति नग | |
| 21 | स्टील वॉश बेसीन | प्रति नग | |
| 22 | पाण्याचे मोठे पिप प्लॅस्टिक 150 लिटर | प्रति नग | |
| 23 | स्टँड फॅन छोटा / मोठा | प्रति नग | |
| 24 | कुलर छोटा / मोठा | प्रति नग | |
| 25 | गादी बेडशीट सह | प्रति नग | |
| 26 | स्वागत कमान /बॉक्स | प्रति नग | |
| 27 | बादली मगसह 20 लिटर | प्रति नग | |
| 28 | मोठी सतरंजी / जाजम 10x12 | प्रति नग | |
| 29 | लाईट माळा शंभर बल्ब | प्रति नग | |
| 30 | एलईडी फ्लड लाईट | प्रति नग | |
| 31 | कलर एलईडी फ्लड लाईट | प्रति नग | |